**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ८७/२०२४ मधील नि. १८ वरील आदेश</u>.**

(**CNR-MHAH**23000206-2024)

१. अर्ज व म्हणणे पाहिले.

२. प्रतिवादी क्र.१ ते ७ यांनी अर्जात कथन केले आहे की, सदर दाव्यामध्ये ते वकीलांमार्फत हजर झाले असून त्यानंतर त्यांना मुदतीत कैफियत देणे आवश्यक होते. परंतू प्रतिवादी यांना कायदयाचे ज्ञान नसल्याने तसेच त्याकरीता वकीलांशी चर्चा करुन त्यांची नेमणुक करण्यास उशीर झाला. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ७ यांना मुदतीत कैफियत दाखल करणे शक्य झाले नाही. परंतु दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यासाठी प्रतिवादी क्र. १ ते ७ यांची कैफियत पटलावर येणे आवश्यक आहे. तसेच कैफियत व म्हणणे दाखल करण्यास झालेला उशीर माफ होऊन कैफियत स्वीकारल्याने वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, कैफियत दाखल न झाल्यास प्रतिवादी क्र. १ ते ७ यांचे अपरिमीत नुकसान होणार आहे. सबब प्रस्तुत अर्ज.

३. वादी यांनी याच अर्जा पाठीमागे म्हणणे देवून अर्जास हरकत दर्शविली. वादीचे कथनानुसार, अर्जातील कथन योग्य व बरोबर नाही. तसेच प्रतिवादी क्र.४ व ७ यांना दि.१३/०६/२०२४ रोजी बजावणी झालेली आहे. परंतु प्रतिवादींनी जाणीवपूर्वक कैफियत देण्यास उशीर केलेला आहे. त्यामुळे, सदर प्रतिवादींचा अर्ज नामंजूर करण्यात यावा. तसेच सदरचा अर्ज मंजूर करण्याचे न्यायालयाचे मत झाल्यास रु.५,०००/- कॉस्ट करण्यात यावी, अशी विनंती वादी यांनी केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन करता, प्रतिवादी क्र.१, २, ४ व ७ यांना दिनांक

१३/०६/२०२४ रोजी समन्सची बजावणी झाली. तसेच प्रतिवादी क्र.१ ते ७ ते दिनांक ०५/०९/२०२४ रोजी प्रस्तुत प्रकरणात हजर झाले आहेत. अशा परिस्थीतीत समन्सची बजावणी झाल्यापासून कमीत कमी ३० व जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफियत देणे आवश्यक होते. परंतु त्यांनी विहित मुदतीत कैफीयत दिलेली नाही. प्रस्तुत अर्ज दिनांक २५/१०/२०२४ रोजी दिला आहे. यावरुन कैफीयत दाखल करण्यास साधारणपणे एक महिना १२ दिवसांचा विलंब झाला आहे. प्रस्तुत दावा हा वाटप, कब्जा, जाहीर ठराव तसेच निरंतरचे ताकीद मनाई हुकुमासाठी दाखल केला असल्यामुळे तसेच प्रतिवादी क्र.१ ते ७ हे त्यामध्ये आवश्यक पक्षकार म्हणून सामील आहेत. अशा परिस्थितीत, त्यांना कैफीयत देण्यास संधी न दिल्यास मुळ वादमुद्दा गुणदोषावर निर्णित न होता नवीन प्रकरण दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे त्यांची कैफीयत अभिलेखावर आल्यास उभय पक्षकारांचा पुरावा होवून वादातील मुदयांचे एकाचवेळी गुणदोषावर निरसन होईल. त्यामुळे, प्रतिवादी क्र. १ ते ७ यांना कैफियत देण्यास झालेला विलंब हा वादी यांना खर्चाची रक्कम देण्याच्या अटीवर माफ करणे न्यायाचे दृष्टीने संयुक्तिक ठरणार आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज (नि.क्र.१८) प्रतिवादी क्र.१ ते ७ यांनी वादी यांना खर्चाची रक्कम रुपये ७००/– देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

AMIT NAGESH KULKARNI
Digitally signed by AMIT NAGESH KULKARNI
Date: 2025.01.06 15:40:48 +0530

श्रीगोंदा.
दिनांक ०६/०१/२०२५.

**( ए.एन. कुलकर्णी )**
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.

**–: <u>प्र मा ण प त्र</u> :–**

प्रमाणीत करण्यात येते की, या पी. डी. एफ. फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ आदेशाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | एस.एस.सातपुते (श्रेणी–२) |
| न्यायालयाचे नांव | : | अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी श्रीगोंदा,ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर. |
| न्यायनिर्णय घोषित केल्याचा दिनांक | : | ०६.०१.२०२५ |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केल्याचा दिनांक | : | ०६.०१.२०२५ |
| न्यायनिर्णय अपलोड दिनांक | : | ०६.०१.२०२५ |